# MAHARASHTRA MAHAVIDYALAYA, NILANGA

# Criterion III

## Research, Innovations & Extension

3.2.2 Number of workshops/seminars/conferences including on Research Methodology, Intellectual Property Rights (IPR) and entrepreneurship conducted during the last five years

## Metric: 3.2.2.1

## 2018-23

EST. 1970 MAHARASHTRA SHIKSHAN SAMITI'S

# MAHARASHTRA MAHAVIDYALAYA NILANGA

(Arts, Commerce, Science, Information Technology & Vocational)
Re-Accredited "B+" Grade (CGPA-2.62)
NILANGA – 413521 Dist.Latur (Maharashtra State)

## A Programme Under Language Communication Skill

## Organized by the Dept. of Languages

## The Academic Year 2018-19

**Organizer:- Maharashtra Mahavidyalaya, Nilanga**

| Name of Activity | Date | Time | Venue | No. of Students of Participated |
|---|---|---|---|---|
| Song Workshop | 16/01/2019 | 10:30 AM to 05:30PM | Hall No. 27 | 95 |

### *Introduction*

Maharashtra Mahavidyalaya, Nilanga, organized a Song Workshop on 16/01/2019 aimed at enhancing musical skills, encouraging creative expression through songwriting, and fostering a deeper appreciation for music among students. This report provides an overview of the workshop, its objectives, structure, participant details, key points discussed, and outcomes.

### *Objectives*

The primary objectives of the Song Workshop were:

Principal
Maharashtra Mahavidyalaya
Nilanga-413521 Dist.Latur

1. **Musical Skill Development**: To improve participants' musical skills, including songwriting, composing, and performing.
2. **Creative Expression**: To provide a platform for students to express their emotions and stories through song.
3. **Understanding Music Theory**: To educate participants about the basics of music theory and composition.
4. **Encouraging Artistic Engagement**: To foster a love for music and songwriting among students.

## *Outcomes*

1. **Improved Musical Skills**: Participants demonstrated improved understanding and application of songwriting techniques and music theory.
2. **Creative Output**: The workshop resulted in a diverse collection of original songs, reflecting participants' creativity and individual styles.
3. **Positive Feedback**: Participants provided positive feedback, appreciating the interactive format, practical exercises, and constructive feedback.
4. **Increased Confidence**: Many participants reported increased confidence in their songwriting and performance abilities.

## *Impact on Participants*

The workshop had several positive impacts on the participants:

1. **Enhanced Creativity**: Stimulated creative thinking and expression through songwriting.
2. **Musical Appreciation**: Fostered a deeper appreciation for the art of songwriting and music composition.
3. **Skill Development**: Improved understanding and application of music theory and songwriting techniques.
4. **Community Building**: Created a supportive community of aspiring songwriters and musicians who can continue to inspire and learn from each other.

## *Conclusion*

The Song Workshop organized by Maharashtra Mahavidyalaya, Nilanga, was a resounding success. It effectively met its objectives of nurturing musical talent, fostering creative expression, and enhancing participants' understanding of songwriting and music theory. The positive feedback and noticeable improvement in participants' musical skills underscore the workshop's value as an educational and creative initiative.

PRINCIPAL
Maharashtra Mahavidyalaya
NILANGA-413521 Dist.Latur

A Report Pre-Workshop Preparation made by College to organize the Workshop

MAHARASHTRA MAHAVIDYALAYA NILANGA 413521 Dist.Latur

# सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन

आणि

# महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा. ता. निलंगा जि. लातूर

यांच्या संयुक्त विद्यमाने

## बाबुजी, गदिमा आणि पुलं या महात्रयींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त

### लेखन - काव्य आणि संगीत कार्यशाळा

### नियोजन /आढावा बैठक

महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई आणि महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा ता. निलंगा, जि.लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बाबुजी, गदिमा, पुलं या महात्रयींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त दि. १६ जानेवारी २०१९ रोजी होणा-या लेखन, काव्य, आणि संगीत कार्यशाळेचे नियोजन करण्यासाठी पहिली नियोजन बैठक दि. ०७ जानेवारी २०१९ रोजी दु. ०१,०० वाजता स्टाफरुम मध्ये प्राचार्य डॉ. व्ही. एल. एरंडे यांच्या अध्यक्षतेखाली बोलावण्यात आली. या बैठकीत कार्यशाळा समन्वयक, डॉ. हंसराज भोसले यांनी कार्यशाळेस्वरुपा विषयी मुंबई येथे झालेल्या बैठकीचा वृत्तांत सर्व स्टाफच्या समोर मांडला. महाराष्ट्रात या कार्यशाळेची सुरुवात लातूर जिल्ह्यातील संजिवनी महाविद्यालयातून डिसेंबर महिण्यात झालेली असून, उर्वरित महाविद्यालयात डिसेंबर व जानेवारीमध्ये त्या-त्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील निवडक १०० महाविद्यालयात लेखन, काव्य, आणि संगीत कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार असल्याचे प्राचार्य आणि स्टाफला अवगत करुन दिले.

लातूर जिल्ह्यात तीन महाविद्यालयात ही कार्यशाळा घेतली जाणार आहे. त्यामध्ये १) चाकूर तालुक्यात संजीवनी महाविद्यालय, चापोली. २) उदगीर तालुक्यात महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर आणि ३) निलंगा तालुक्यातील महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा. या आमच्या महाविद्यालयाचा त्यात समावेश आहे. याचा आम्हाला अत्यानंद आणि अभिमान आहे.

या नियोजन आढावा बैठकीला वरिष्ठ महाविद्यालयातील पुढील प्राध्यापक उपस्थित होते.

1) प्राचार्य, डॉ. व्ही. एल. एरंडे - अध्यक्ष
2) उपप्राचार्य, डॉ. एम. एन. कोलपूके
3) डॉ. हंसराज भोसले, समन्वयक
4) डॉ. जे. के. डावळे
5) डॉ. एम. आर. गोसावी
6) डॉ. एस. जी. कुलकर्णी
7) डॉ. एम. एम. चौधरी
8) डॉ. डी. एच. जाधव
9) डॉ. सी. जे. कदम
10) डॉ. बी. एम. वाघमारे
11) डॉ. जी. पी. शेंडगे
12) डॉ. बी. एस. गायकवाड
13) डॉ. बी. आर. गायकवाड
14) डॉ. ए. एम. मुळजकर
15) डॉ. ए.बी. धालगडे
16) डॉ. डी. एस. चौधरी
17) डॉ. एन.व्ही. पिनमकर
18) डॉ. एस. एस. देवनाळकर
19) डॉ. व्ही. पी. सांडूर
20) डॉ. एस. जी. बेंजलवार
21) प्रा. एस.एस. बदनाळे
22) प्रा. मीनाक्षी बोंडगे

दि. १४/०१/२०१९ रोजी कार्यशाळेचे नियोजन आयोजन करण्यासाठी दुसरी बौठक घेण्यात येईल असे बौठकीचे अध्यक्ष, मा. प्राचार्य, डॉ. व्ही. एल. एरंडे यांनी सांगितले व या बैठकीत कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी पुढील समित्याचे गठन करण्यात आले.

**१) लेखन कार्यशाळा**

| | |
|---|---|
| १) डॉ. बी. एस. गायकवाड | (मराठी विभाग) |
| २) डॉ. व्ही. पी. सांडूर | (लोकप्रशासन विभाग) |
| उमाजी तोरकड | (सेवक ) |

**२) काव्य कार्यशाळा**

| | |
|---|---|
| १) डॉ. एन. व्ही. पीनमकर | (वाणिज्य विभाग ) |
| २) डॉ. एस. जी. बेंजलवार | (इतिहास विभाग ) |
| ज्ञानेश्वर खांडेकर | (सेवक) |

**३) संगीत कार्यशाळा**

| | |
|---|---|
| १) डॉ. ए. एम. मुळजकर | ( इंग्रजी विभाग ) |
| २) प्रा. जे. पी. शेंडगे | ( वनस्पतीशास्त्र विभाग ) |
| प्रकाश सुरवसे | (सेवक ) |

वरीलप्रमाणे दोन प्राध्यापकाची एक समिती करुन कामाची विभागणी करण्यात आली.

दि. १४/०१/२०१९ रोजी पूर्वसूचनेनुसार कार्यशाळा समन्वयक, डॉ. हंसराज भोसले व लेखन, काव्य, संगीत कार्यशाळेसाठी गठित केलेल्या समितीच्या सदस्यांची बैठक प्राचार्य कक्षात सकाळी १०.३० वाजता बोलावण्यात आली. अध्यक्ष म्हणुन मा. प्राचार्य डॉ. व्ही. एल. एरंडे यांनी कार्यशाळेच्या उद्घाटनाचे स्थळ निश्चितीसंदर्भात व व नंतर स्वतंत्रपणे तीन सभागृहात तीन कार्यशाळा घेण्यात याव्यात त्यासाठी लागणारी सर्व सुविधा महाविद्यालयाकडुन दिली जाईल. त्याचे योग्य नियोजन करण्यासाठी मार्गदर्शन व सूचना केल्या. त्या त्या समितीतील सदस्यांनी कार्यशाळेचे समन्वयक डॉ. हंसराज भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली, सेवकांना सोबत घेऊन बैठक व्यवस्था स्टेज व्यवस्था, साऊंड सिस्टीम, माईक व्यवस्था, बॅनर, प्रशिक्षणार्थी बॅचेस, मार्गदर्शकांची व्यवस्था इ. जबाबदारी व्यवस्थित पार पाडावी असे आवाहन केले.

या बैठकीला पुढील प्राध्यापक उपस्थित होते.

| | |
|---|---|
| डॉ. व्ही. एल. एरंडे | प्राचार्य तथा कार्यशाळा अध्यक्ष |
| डॉ. हंसराज भोसले | कार्यशाळा समन्वयक |
| डॉ. बी. एस. गायकवाड | मराठी विभागप्रमुख |
| डॉ. ए. एम. मुळजकर | इंग्रजी विभागप्रमुख |
| प्रा. जी. पी. शेंडगे | वनस्पतीशास्त्र विभाग |
| डॉ. एन. व्ही. पीनमकर | वाणिज्य विभाग |
| डॉ. एस. जी. बेंजलवार | इतिहास विभागप्रमुख |
| डॉ. व्ही. पी. सांडूर | लोकप्रशासन विभागप्रमुख |
| प्रकाश सुरवसे | सेवक |
| ज्ञानेश्वर खांडेकर | सेवक |
| उमाजी तोरकड | सेवक |

MAHARASHTRA MAHAVIDYALAYA NILANGA 413521 Dist.Latur

Different committees were framed for the Workshop. Details of committees.

A Brief Report of Workshop on Writing, Poetry & Music Dated: 16 Jan. 2019

MAHARASHTRA MAHAVIDYALAYA NILANGA 413 521 Dist. Latur

**कार्यशाळा अहवाल**

**सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन**

आणि

**महाराष्ट्र महाविद्याल, निलंगा. ता. निलंगा जि. लातूर**

यांच्या संयुक्त विद्यमाने


**बाबुजी, गदिमा आणि पुलं यां महात्रयींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त**

लेखन - काव्य आणि संगीत कार्यशाळा

दि. १६ जानेवारी २०१९

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा यांच्या संयुक्त वतीने आयोजित लेखन, काव्य आणि संगीत कार्यशाळेचे उद्धाटन दि. १६ जानेवारी २०१९ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता महाविद्यालयाच्या मुख्य खुल्या सभागृहात, मांडव टाकून मान्यवरांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन करुन करण्यात आले. उद्धाटन सोहळ्यासाठी उद्धाटक म्हणुन, संस्थाध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे, माजी मुख्यमंत्री मा. डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब, हे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एल. एरंडे, हे अध्यक्ष होते. तर उपस्थितीमध्ये लेखन, काव्य, संगीत कार्यशाळेसाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून आलेले परभणीचे कवी डॉ. केशव खटींग व डॉ. कल्याण कदम, संगीतकार गायक डॉ. पंजाब आंभोरे, वादक डॉ. व्ही. एम. देशमुख व पंकज शिरभाते आणि काव्यसमीक्षक, गझलकार डॉ. संतोष कुलकर्णी आणि अजय पांडे हे उपस्थित होते.

त्याचबरोबर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एम. एन. कोलपूके, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य, प्रा. पी. पी. गायकवाड व कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. हंसराज भोसले यांची प्रमुख उपस्थित होती.







लेखन काव्य आणि संगीत कार्यशाळेचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. हंसराज भोसले यांनी केले. प्रास्ताविकपर मार्गदर्शनमध्ये, डॉ. भोसले यांनी सर्व मान्यवरांचे महाविद्यालयाच्या वतीने समन्वयक म्हणून स्वागत केले व कार्यशाळेची रुपरेखा विद्यार्थ्यांच्या समोर मांडली. प्रत्येक कार्यशाळेसाठी १०० विद्यार्थ्यांची मर्यादा असून प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या नियमानुसार नावनोंदणी झालेली असून एकाच विद्यार्थ्यांना एकाच वेळी तीन्ही कार्यशाळेसाठी नाव नोंदणी करता येणार नाही. आवडीच्या एकाच कार्यशाळेत दिवसभर सहभाग घ्यावा लागेल. संगीत, लेखन व काव्य या विषयावरील ही कार्यशाळा उद्धाटन समारंभ संपल्यानंतर ११.३० वाजता वेगवेगळया तीन स्वतंत्र दालनात सुरु होईल. दालन क्र. २२ मध्ये काव्य लेखन कार्यशाळा सुरु होईल. दालन क्रं. २८ मध्ये लेखन कार्यशाळा सुरु होईल. दालन क्र. २७ मध्ये संगीत कार्यशाळेचे सत्र सुरु होतील. या संदर्भात प्रशिक्षणार्थी विद्यार्थी व






Some moments of Workshop & other details in Marathi Lan

MAHARASHTRA MAHAVIDYALAYA NILANGA 413521 Dist. Latur

मार्गदर्शकासाठी कार्यशाळेच्या कार्यक्रम पत्रिकेचे स्वरुप प्रास्ताविकातून स्पष्ट करुन दिले. व विद्यार्थ्यांनी दिवसभर दोन सत्रात चालणा-या या कार्यशाळेचा आनंद घ्यावा असे आवाहन करून शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र शासनाच्या वतीने ही कार्यशाळा महाविद्यालयात घेण्यासाठी परवानगी देऊन संस्था आणि प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांसाठी काम करण्याची मोठी संधी उपलब्ध करून दिल्या बद्दल संस्थाअध्यक्ष मा. डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब व प्राचार्य डॉ. व्ही. एल. एरंडे यांचे विशेष आभार मानले. या कार्यशाळेच्या माध्यमातून बाबुजी गदिमा व पुलं या महात्रयींच्या जन्मशताब्धी निमित्त विद्यार्थ्यांच्या मनामध्ये साहित्य, काव्य व संगीत या कलेविषयीच्या स्मृती पुन्हा जागवतील असा आशावाद व्यक्त केला.




उद्घाटनपर मार्गदर्शन करतांना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेबांनी कार्यशाळेचे उद्घाटन झाले अशी औपचारिक घोषणा करून कार्यशाळेला शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. निलंगेकर साहेब म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे. यासाठी महाराष्ट्र शिक्षण समितीची स्थापना १९७० साली करण्यात आली असल्याचे सांगीतले अशा कार्यशाळेतून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत कलेचा प्रसार होण्यास मदत होते. व यातून काही कलाकार निर्माण होण्यास मदत होईल विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा पुरेपूर उपयोग करूण घ्यावा, असे मार्गदर्शन केले.




कार्यशाळेचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एल. एरंडे म्हणाले की, नांदेड विद्यापीठाशी संलग्नीत आमचे हे महाविद्यालय आहे. उच्च शिक्षण सहसंचालन व महाराष्ट्र शासनाच्या कार्य संचालनालय कार्यालयाने आमच्या महाविद्यालयाची निवड केली याचा आम्हाला आनंद आहे. स्वारातीम नांदेड विद्यापिठातील ग्रामीण भागातील उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार प्राप्त, तीन हजारापेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेले आमचे एकमेव महाविद्यालय असल्याची पाहुण्यांना जाणीव करुन दिली.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आमची संस्था नेहमीच अग्रणी असते. आज या कार्यशाळेसाठी महाराष्ट्रातील त्या त्या क्षेत्रातील जाणकार तज्ञ मंडळी मार्गदर्शक म्हणून येथे आलेली आहेत. त्यांच्या ज्ञानाचा विद्यार्थ्यांना निश्चित फायदा होईल. म्हणून विद्यार्थी मित्रांनो तुम्हाला जे जे येते, ते सादर करा जे येत नाही, ते या कार्यशाळेतून मार्गदर्शकांशी चर्चा करून आतमसात करून घेण्याचा प्रयत्न करा. दिवसभर चालणा·या या कार्यशाळेतून तुमची साहित्य, संगीत, व काव्याची भुक भागवून घ्या. साहित्य, संगीत आणि काव्य या कलेची जिवनात साधना करा कारण सध्याचे युग हे केलेचे युग आहे त्यासाठी या कार्यशाळेचा पुरेपूर लाभ घ्या. आमच्या महाविद्यालयीन जिवनात आम्ही उपाशी राहून ज्ञानसाधना केली. तुमच्या जेवनाची व्यवस्था महावविद्यालयाने केलेली आहे. तेव्हा भरल्या पोटाने तुम्ही या कार्यशाळेचा आनंद घ्यावा. असे आवहान केले

Some moments of Workshop & other details in Marathi Language

MAHARASHTRA MAHAVIDYALAYA
NILANGA
413521
Dist. Latur

यावेळी कार्यशाळेसाठी उपस्थित असणा-या मार्गदर्शकांपैकी प्रातीनिधिक दोन मार्गदर्शकांनी आपली मनोगते व्यक्त केली त्यामध्ये कवी डॉ. केशव खटींग यांनी भारदार कविता सादर केली. तर डॉ. पंजाब आंभोरे यांनी मराठवाडा गीताचे सादरीकरण करून दिवसभर चालणा-या कार्यशाळेची झलक उद्धाटनपर कार्यक्रमातून दाखवून दिली. उद्धाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एन.व्ही.पीनमकर यांनी केले तर आभार जी. जी. शिवशेट्टे यांनी मानले.







**लेखन कार्यशाळा :-**


हॉल क्रमांक २८ मध्ये लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. उद्धाटन समारंभानंतर ११.३० वाजता लेखन कार्यशाळेला सुरुवात झाली ती दोन सत्रात पार पडली. पहिल्या सत्रात कवी केशव खटींग यांनी कथा, कविता, कांदबरी, ललीतलेखन, नाटक या वाङ्मय प्रकाराचे लेखन कसे करायचे यावर सखोल असे मार्गदर्शन केले. लेखनासाठी शिक्षण असावेच असे नाही, तर अनुभवातून माणूस शब्दनिर्मीती करू शकतो. खानदेश कन्या बहिनाबाई यांनी निसर्गाच्या शाळेत शिक्षण घेऊन शब्दांची बांधणी केली. लेखन कौशल्याची वाढ कधीही झपाटयाने होत नाही ती प्रयत्नांनी त्यात हळू हळू वाढ होत असते. लेखक होण्यासाठी आधी उत्तम वाचक व्हावे लागते. काव्य निर्मीतीसाठी आधी कविता ऐकावी लागते असा महत्त्वपुर्ण सल्ला कवी केशव खटींग यांनी विद्यार्थ्यांना दिला.

लेखन कार्यशाळा चर्चात्मक पध्दतीने पार पडली विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेले प्रश्न आणि त्या प्रश्नांना उत्तरे अशा खुल्या वातावरणात ही कार्यशाळा झाली वाचन करताना पुस्तकांना धर्माचे लेबल लावू नये, लेखन करणाऱ्याने कधीही प्रसिध्दीची हाव करू नये, चांगले लिहण्यासाठी जात, धर्म, भाषा याच्या पलिकडे जाऊन वाचन वाचकांनी केले पाहिजे असे सांगून बोलण्याची आणि लेखनाची भाषा वेगळी असते ती समजून घेतली पाहीजे. वास्तवाच्या जवळ गेल्याशिवाय चांगले लेखन करता येत नाही असे मोलाचे मार्गदर्शन केले. दु. १.३० वाजता पहिले सत्र संपले.




Some moments of Writing Workshop where students were taught how to write poems, essays etc.


MAHARASHTRA MAHAVIDYALAYA
NILANGA
413521
Dist.Latur



दुपारी २.३० वाजता सुरू झालेल्या दुसऱ्या सत्रात डॉ कल्याण कदम यांनी जहीरात लेखन, अहवाल लेखन, बातमी कशी तयार करावी यावर विद्यार्थ्यांचे लक्ष केद्रीत करुन, जाहीरातीचे लेखन करताना कोणती काळजी घेतली पाहीजे, बातमी लिहीतांना व तयार करताना कोणत्या गोष्टी आवश्यक असतात यावर सविस्तर असे मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना काही विषय देऊन त्यांच्याकडून प्रात्यक्षिक करून घेतले त्यानंतर दुरुस्तापर पुन्हा मार्गदर्शन केले. लेखन कार्यशाळेचे संचलन डॉ. बी. एस. गायकवाड व डॉ. विठ्ठल सांडूर व सेवक उमाजी तोरकड यांनी केले. लेखन कार्यशाळेत ८९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**काव्य कार्यशाळा :-**

काव्य कार्यशाळेचे आयोजन हॉल क्र. २२ मध्ये करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी ख्यातनाम समिक्षक डॉ. संतोष कुलकर्णी तथा श्री अजय पांडे सर साधनव्यक्ती मार्गदर्शक म्हणुन उपस्थित होते. या कार्यशाळेची सुरुवात मान्यवरांच्या स्वागताने झाली उद्घाटन कार्यक्रमानंतर पहिल्या सत्राला सुरुवात ठीक ११.३० वाजता करण्यात आली. पहिल्या सत्रात डॉ. संतोष कुलकर्णी यांनी कवीतेचा उगम कसा होतो, कवीतेची सुरुवात कशी होते. आणि कवीतेमागची मानसशास्त्रीय कारणे कोणती असतात याची चर्चा केली. कवीतेला तिच्या मुर्त रुपात येण्यापूर्वी, सुप्त रुपात जन्मावे लागते, अनेक विषय, प्रतीके , रुपके यांचा वापर करुन लय आणि ताल सांभाळत कवीतेचा प्रवास सुरु राहतो असे डॉ. कुलकर्णी यांनी स्पष्ट केले. याच सत्रात श्री. अजय पांडे यांनी भारतीय कवितेचा उदय कसा झाला, तिचा इतिहास कसा आहे याची सविस्तर चर्चा केली. भारतातील अनेक राजे काव्यशास्त्राचे संवर्धक होते व त्यामुळे काव्यशास्त्राचा उदय आणि विकासावर, वेगवेगळ्या संस्कृतींचा कसा प्रभाव झाला ते त्यांनी स्पष्ट केले. दु. ०१.३० वाजता पहिल्या सत्राचा समारोप झाला.



एक तासाच्या मध्यंतरानंतर पुन्हा दुसऱ्या सत्राला दु. ०२.३० वाजता सुरुवात झाली. डॉ. संतोष कुलकर्णी यांनी कवीता आणि व्याकरण यांचा परस्पर संबंध सखोलपणे मांडला. व्याकरणाचा कवितेवर होणारा परीणाम त्यांनी सोदाहरण स्पष्ट केला. व्याकरणाचा अभ्यास न करता कवीता करता येत नाही हे त्यांनी आवर्जून स्पष्ट केले. त्यांनी व्याकरणातील अनेक बारकावे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. शबदांची संख्या, काळ, भावनेची दिशा ईत्यादी कवीतेच्या एकूण रचनेवर कसा परिणाम होत जातो हे त्यांनी उदाहणांसह स्पष्ट केले. श्री अजय पांडे सरांनी कवीतेतील मात्रा आणि वृत्त यांवर प्रकाश टाकला. कवीतेतील मात्रा किती असतात त्यावर कवीतेचा छंद आणि कवितेतील ताल ठरत असते. त्यामुळे कवीता रचत असताना कवीतेच्या मात्रांचा विचार करणे गरजेचे असते.




दुसऱ्या सत्राच्या शेवटी विद्यार्थी आणि साधन व्यक्ती यांच्यात संवाद साधला गेला. काही विद्यार्थ्यांनी स्वत:च्या कविता साधन व्यक्तींना दाखवल्या व त्यात काही दुरुस्त्या करुन घेतल्या. अंतीम भागता उपस्थित विद्यार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात प्रमाणपत्र वितरण करण्यात आले व काव्य कार्यशाळेचा समारोप सायं. ०५.३० वाजता करण्यात आला. काव्य लेखन

Poetry Workshop where students taught about writing poemes etc.

MAHARASHTRA MAHAVIDYALAYA
NILANGA
413521
Dist.Latur

## Maharashtra Mahavidhyalaya , Nilanga

## Student participant list

| Sr. | NAME | GENDER | Sr. | NAME | GENDER |
|---|---|---|---|---|---|
| 1 | CHAVAN JYOTI NETAJI | FEMALE | 45 | BAHETI AMRUTA ISHWARPRASAD | MALE |
| 2 | CHINCHOLE ANITA SHIVRUDRA | FEMALE | 46 | BAINGIRE RITIK NARSING | MALE |
| 3 | DIVE YASHODA RAM | FEMALE | 47 | BALKUNDE SHANKAR RAMESH | MALE |
| 4 | DONGARE DIPALI MURLIDHAR | FEMALE | 48 | BARAMADE PRATIK NETAJI | MALE |
| 5 | FUNDKARE SANDHYARANI VITTHAL | FEMALE | 49 | BELURE MADHAV RAJENDRA | MALE |
| 6 | GANGTHADE VAISHNAVI SUKHAVAS | FEMALE | 50 | BHALERAO AJIT RAJENDRA | MALE |
| 7 | GOBADE VAISHNAVI KRISHNA | FEMALE | 51 | BIRAJDAR OMKAR YASHAWANT | MALE |
| 8 | HEDE NIKITA VIJAYKUMAR | FEMALE | 52 | BORDE ROHIT ANKUSH | MALE |
| 9 | IRALAPALLE MANISHA SANJIV | FEMALE | 53 | BOYANE RUSHIKESH DILIP | MALE |
| 10 | JADHAV JYOTI BHAGVAT | FEMALE | 54 | CHAVAN LAXMAN NETAJI | MALE |
| 11 | JADHAV SATYABHAMA PRABHAKAR | FEMALE | 55 | CHAVAN SANDIP SURESH | MALE |
| 12 | JADHAV VAISHNAVI DAYANAND | FEMALE | 56 | GHAYAL MAHESH GOVIND | MALE |
| 13 | JANGLBONE AMOL UDHAV | FEMALE | 57 | JADHAV OMKAR NETAJI | MALE |
| 14 | KADAM SWATI SATISH | FEMALE | 58 | JADHAV OMKAR SANJAY | MALE |
| 15 | KALE AKSHATA SIDDHESHWAR | FEMALE | 59 | JADHAV SHIVKANYA SHIVDARSHAN | MALE |
| 16 | KAMBLE MAYURI VIDYASAGAR | FEMALE | 60 | JADHAV VINAY PRASADRAO | MALE |
| 17 | KHARPADE PRAGATI PRAKASH | FEMALE | 61 | JAGTAP PRAVIN DATTATREE | MALE |
| 18 | KHNAKURE VAISHNAVI SANJAY | FEMALE | 62 | KADAM NAGIN HANMANT | MALE |
| 19 | KOLLE POOJA BASVARAJ | FEMALE | 63 | KAMBLE VINOD SAHEBRAO | MALE |
| 20 | MANE SNEHA SHESHERAO | FEMALE | 64 | KHADIM RAFIUDDIN SHAFIUDDIN | MALE |
| 21 | MORE SUMITRA PRABHAKAR | FEMALE | 65 | KSHIRSAGAR KRUSHNA BHAUSAHED | MALE |
| 22 | NELWADE KALPANA LIMBRAJ | FEMALE | 66 | LANDGE POPAT MUKTARAM | MALE |
| 23 | NITURE SAKSHI SANJAY | FEMALE | 67 | MANIYAR SHAMSTABREJ MAULA | MALE |
| 24 | PANDHARE RAMHARI BHAGWAN | FEMALE | 68 | MEHTRE AKASH RAJU | MALE |
| 25 | PATHAN FATEMUNNISA DILDARKHAN | FEMALE | 69 | MHETRE SHIVSHANKAR MANOHAR | MALE |
| 26 | PAWAR AVANTIKA DATTATRAY | FEMALE | 70 | MULLA SALIM BAKSHUSAB | MALE |
| 27 | RANDIVE PALLAVI PANDURANG | FEMALE | 71 | NANANDKAR PRATHVIRAJ MANOJ | MALE |
| 28 | RATHOD SHILPA SHIVAJI | FEMALE | 72 | PADOLE RAHUL CHANDRAHARSH | MALE |
| 29 | RATHODE ROHINI BHAUSAHEB | FEMALE | 73 | PALAMPALLE AVINASH AMBADAS | MALE |
| 30 | SHAIKH ASHFIYA AYMAN WAHEED | FEMALE | 74 | PATEL AFZAL SALIM | MALE |
| 31 | SHAIKH RUHI ARSHIYA NABI SAB | FEMALE | 75 | PATEL AZRODIN SALIM | MALE |
| 32 | SHAIKH SUMAYA SAMAD | FEMALE | 76 | PATEL NIHALPASHA ARIFALI | MALE |
| 33 | SHINDE PRIYANKA DHARMARAJ | FEMALE | 77 | PATHAN MOINKHAN DILDAR | MALE |
| 34 | SHINDE YOGITA TANAJI | FEMALE | 78 | PATIL ARJUN BALAJI | MALE |
| 35 | SHIVPURE KAJAL NILKANTH | FEMALE | 79 | PATOLE AKSHAY GOVIND | MALE |

MAHARASHTRA
NILANGA
413521
Dist.Latur

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 36 | SIRGAPURE SANA RASUL | FEMALE | | 80 | PAWAR BALIRAM PRATAP | MALE |
| 37 | SOLANKE AISHWARYA BALAJI | FEMALE | | 81 | PAWAR VAIBHAV KONDIRAM | MALE |
| 38 | SOLANKE VIDYESHWARI VITTHALRAO | FEMALE | | 82 | SAUDAGAR ADNAN RIYAZODDIN | MALE |
| 39 | SOLANKE YOGITA YUVRAJ | FEMALE | | 83 | SHAIKH AMIR NAYUM | MALE |
| 40 | SURAVASE YOGITA MALHARI | FEMALE | | 84 | SHINDE DIPAK GIRJAPPA | MALE |
| 41 | SURVASE PRANALI VIJAYKUMAR | FEMALE | | 85 | SHINDE ROHIT RAM | MALE |
| 42 | SURYAWANSHI RANI SITARAM | FEMALE | | 86 | SHINDE SHUBHAM RAGHUNATH | MALE |
| 43 | SURYAWANSHI SONALI DATTATRAYA | FEMALE | | 87 | SHINDE VISHAL VASANT | MALE |
| 44 | WADIKAR SHRADHA RAJKUMAR V. WADIKAR | FEMALE | | 88 | SOLANKE SIDDHESHWAR SATYAWAN | MALE |
| 45 | WAGHMARE AISHWARYA SANJIV | FEMALE | | 89 | SUDE RAMPRASAD BABRUWAN | MALE |
| | | | | 90 | SURVASE JITESHKUMAR JAYBHIM | MALE |
| | | | | 91 | SURYAWANSHI ADARSH NARAYAN | MALE |
| | | | | 92 | SWAMI SHIVAM SANJAY | MALE |
| | | | | 93 | TEKALE GOPAL VENKATRAO | MALE |
| | | | | 94 | UDBALE SOMESHWAR ANNARAO | MALE |
| | | | | 95 | WADIKAR ABHISHEK BALASAHEB V. WADIKAR | MALE |